पोलीस अधीक्षक कार्यालय,धाराशिव.
'नियमित जनसंपर्क'विभाग,
दुरध्वनी क्रंमाक-**8007269000**
ईमेल नं.-**jansampark.osd@gmail.com**

'नियमित प्रसिध्दी पत्रक'(प्रेस नोट)' मंगळवार-दि.**04.02.2025**

धाराशिव शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.**03** फेब्रुवारी रोजी मोटार वाहन कायदा- नियम भंग प्रकरणी एकुण **277** कारवाया करुन **2,17,650 ₹** 'तडजोड शुल्क'वसुल केले आहे.

" अवैध मद्य विरोधी कारवाई."

तुळजापूर पोलीस ठाणे:आरोपी नामे-राहुल शाम हिवराळे, वय **24** वर्षे, रा. मातंगनगर तुळजापूर ता. तुळजापूर जि. धाराशिव हे दि.03.02.2025 रोजी 12.30वा. सु. तुळजापूर शहरातील आठवडी बाजार हडको मैदान जवळ तुळजापूर येथे अंदाजे 700 ₹ किंमतीची 10लिटर गावठी अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. आरोपी नामे-लक्ष्मी वामन कांबळे, वय **48** वर्षे, रा. आपसिंगा ता. तुळजापूर जि. धाराशिव हे दि.03.02.2025 रोजी 16.10वा. सु. आण्णाभाउ साठे नगर येथील आपल्या राहत्या घरालगत आपसिंगा येथे अंदाजे 900 ₹ किंमतीची 15लिटर गावठी अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम- **65(ई)** अन्वये तुळजापूर पो ठाणे येथे स्वतंत्र **2**गुन्हे नोंदविले आहेत.

"रहदारीस धोकादायरीत्या वाहन उभे करणाऱ्यांवर गुन्हे नोंद."

आनंदनगर पोलीस ठाणे:आरोपी नामे-मुजुर गलाब शेख, वय 55 वर्षे, रा. एकोंडी रोउ उमरगा हा.मु. खाजा नगर ता. जि. धाराशिव, बजरंग महादेव कांबळे, वय 30 वर्षे, रा. भोई गल्ली नेहरु चौक धाराशिव ता.जि. धाराशिव,बालाजी मोहन झोंबाडे, वय 35 वर्षे, रा. सांजा धाराशिव ता. जि. धाराशिव यांनी दि.03.02.2025 रोजी 12.25 ते 13.00 वा. सु.आपआपल्या ताब्यातील अनुक्रमे चार चाकी वाहन क्र एमएच 25 एजे 5030, रिक्षा क्र एमएच 25 एके 5080,रिक्षा क्र एमएच 25 बी 5571 ही वाहने बाशी नाका ते सेट्रंलबिल्डींग जाणारे सार्वजनिक मुख्य डांबरी रोडवर रस्त्यावर रहदारीस धोकादायकरीत्या उभे केलेले असताना आनंदनगर पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तीविरुध्द भारतीय न्याय सहिंता कलम 285अन्वये आनंदनगर पो.ठा. येथे स्वतंत्र 3 गुन्हे नोंदवले आहेत.

" मालमत्तेविरुध्द गुन्हे."

धाराशिव शहर पोलीस ठाणे :फिर्यादी नामे-सुरज मनोहर गरड, वय 42 वर्षे, रा. पिंपरी ता. जि. धाराशिव यांची अंदाजे 20,000₹ किंमतीची बजाज कंपनीची डिस्कव्हर मोटरसायकल क्र एमएच 25 एबी 6422 ही दि. 29.01.2025 रोजी 08.00 वा. सु. गणेशनगर येथील प्रताप देशमुख धाराशिव येथुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-सुरज गरड यांनी दि.03.02.2025 रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन धाराशिव शहर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम 303(2) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

उमरगा पोलीस ठाणे :फिर्यादी नामे-विजय दिपक पाटील, वय 28 वर्षे, रा. कदेर ता. उमरगा जि. धाराशिव, ह.मु. गणेश नगर गुंजोटी रोड उमरगा ता. उमरगा जि. धाराशिव यांची अंदाजे 20,000₹ किंमतीची हिरो फॅशन प्रो कंपनीची मोटरसायकल क्र एमएच 24 बीडी 7835 ही दि. 01.02.2025 रोजी 23.30 ते दि. 02.02.2025 रोजी 08.00 वा. सु. विजय पाटील यांचे राहते घरासमोरुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-विजय पाटील

यांनी दि.03.02.2025 रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन उमरगा पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम 303(2) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

ढोकी पोलीस ठाणे :फिर्यादी नामे-इष्टलिंग महादेव शेटे, वय 45 वर्षे, रा. कोंड ता. जि. धाराशिव यांची अंदाजे 15,000₹ किंमतीची हिरो स्पलेंडर कंपनीची मोटरसायकल क्र एमएच 25 एआी 4152 ही दि. 24.01.2025 रोजी 21.00 ते दि. 25.01.2025 रोजी 06.00 वा. सु. इष्टलिंग शेटे यांचे राहते घरासमोरुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-इष्टलिंग शेटे यांनी दि.03.02.2025 रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन ढोकी पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम 303(2) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

नळदुर्ग पोलीस ठाणे :फिर्यादी नामे-अंकुश मल्हारी लोखंडे, वय 56 वर्षे, रा. जळकोट ता. तुळजापूर. जि. धाराशिव यांचे अंदाजे 22,500₹ किंमतीचे सौर, उर्जा प्लॅट वायर, कनेक्टर हे दि.17.01.2025 रोजी 12.00 ते दि. 18.01.2025 रोजी 12.30 वा. सु. अणदुर शिवारामधील शेतातुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेल्या. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-अंकुश लोखंडे यांनी दि.03.02.2025 रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन नळदुर्ग पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम 303(2) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

**"खुन."**

वाशी पोलीस ठाणे :आरोपी नामे-सरदार शेख, अकबर शेख, इतर दोन इसमरा. पिंपळणेर ता.जि. बीड यांनी दि.02.02.2025 रोजी 20.30 ते 23.30 वा. सु. एनएच 52 रोडवर घुलेमाळ येथे वाशी शिवारात मयत नामे-मुस्ताकीन जब्बार शेख, वय 34 वर्षे, रा.साळेगांव ता.केज जि. बीड यांना नमुद आरोपींनी अनैतिक संबंधाच्या कारणावरुन अज्ञात हत्याराने डोक्यावर वार करुन जिवे ठार मारले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-जब्बार चॉद शेख, वय 55 वर्षे, रा. साळेगाव ता. केज जि. बीड यांनी दि.03.02.2025रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन वाशी पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम 103(1), 3(5) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

**"मारहाण."**

धाराशिव ग्रामीण पोलीस ठाणे :आरोपी नामे-केशव महादेव हराळे, महादेव रावण हराळे, वैष्णवी केशव हराळे, सहदेव प्रभु हराळे, राजुबाई महादेव हराळे, हणुमंत शहाजी हराळे सर्व रा. घाटंग्री ता. जि. धाराशिव यांनी दि.02.02.2025 रोजी 12.00 वा. सु. सुग्रीव बाबु थोरात यांचे घरासमोर घाटंग्री येथे फिर्यादी नामे- कल्पना दिलीप हराळे, वय 40 वर्षे, रा. घाटंग्री ता. जि. धाराशिव यांचे सासरे नामे एकनाथ भिमा हराळे यांना नमुद आरोपींनी गैरकायद्याची मंडळी जमवून जिवे ठार मारण्याचे उद्देशाने शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी, रॉड, काठी, दगडाने मारहाण करुन गंभीर जखमी केले.अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-कल्पना हराळे यांनी दि.03.02.2025रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन धाराशिव ग्रामीण पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम 109, 118(1) 115(2), 352, 189(2),191(1), 191(3), 190अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

धाराशिव ग्रामीण पोलीस ठाणे :आरोपी नामे-बंटी राठोड, अनिल राठोड दोघे रा. घाटंग्री ता. जि. धाराशिव यांनी दि.03.02.2025 रोजी 07.45 वा. सु. बंटी राठोड यांचे टपरी जवळ सेवालाल चौक घाटंग्री येथे फिर्यादी नामे- कुसूम गोरख कांबळे, वय 45 वर्षे, रा. घाटंग्री ता. जि. धाराशिव यांचा मुलगा गोविंद कांबळे यांना नमुद आरोपींनी मागील भांडणाचे कारणावरुन जातीवाचक शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी, रॉडने मारहाण करुन जखमी केले. जिवे ठार मारण्याची धमकी दिली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-कुसुम कांबळे यांनी दि.03.02.2025रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन धाराशिव ग्रामीण पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम 118(1) 115(2), 351(2)(3), 352, 3(5) सह अ.जा.ज.अ.प्र.का. कलम 3(1)(आर), 3(1) (एस) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

**"फसवणुक करुन जादुटोना करणे व शिवीगाळ करुन धमकी देणाऱ्यावर गुन्हा दाखल ."**

कळंब पोलीस ठाणे :आरोपी नामे-सविता सचिन डिकले, सचिन पांडुरंग डिकले दोघे रा. तांदुळवाडी ता.कळंब जि. धाराशिव यांनी दि.01.01.2025 रोजी 10.00 वा. सु. तांदुळवाडी येथे व दि. 22.01.2025 रोजी 21.00 वा. सु. तांदुळवाडी येथे फिर्यादी नामे- मधुमंजली संदीप काळे, वय 32 वर्षे, रा. तांदुळवाडी ता. कळंब जि. धाराशिव यांनी कुलस्वामीनी बचतगट काढला असुन बचतगटाचे सचिव यातील सविता सचिन डिकले व बचतगटाचे सदस्यांनी मिळून

आय.सी.आय.सी.आय बॅक शाखा कळंबचे 4,95,000₹ चे कर्ज घेतले होते. त्याप्रमाणे बचतगटाचे सर्व सदस्य यांना नमुद आरोपी यांनी मला पैशाचे काम आहे असे म्हणून 3,90,000₹ फिर्यादी कडून उसने घेवून पैसे परत न करता फिर्यादी व बचतगटाचे सदस्याची फसवणुक केली. फिर्यादी यांनी पैसे मागीतले असता माझ्याकडे कोणाचेही पैसे नाही मला पैसे मागीतले तर बघा माझ्या अंगामध्ये दैवी शक्ती आहे मला भानामती करता येते तुझ्या वंशाचा दिवा बुडवून टाकेल असे म्हणून तलवारीने कापुन जिवे मारण्याची धमकी दिली. नमुद आरोपींनी फिर्यादीचे खिडकीमधून दोन लिंबु सुया टोचलेले, हळदीकुंकु, बुक्का व राख लावुन घरामध्ये जादुटोना करण्याचे उद्देशाने टाकले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-मधुमंजली काळे यांनी दि.03.02.2025रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन कळंब पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम 318 (4), 316(2), 352, 351 (2), 3(5) सह कलम 3(2) महा.जादुटोना प्रतिबंध अधिनियम 2013 अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

---

जनसंपर्क विभाग धाराशिव पोलीस